ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT

वर्ष २१ | पुणें, बुधवार तारीख १२ सप्टेंबर, १९५६ | अंक ३७

## विविध माहिती

**भूदानाची प्रगति**—भूदान चळवळीस आतांपर्यंत ४१,१३,१७० एकर जमीन मिळाली आहे. त्यापैकीं ५,१४,८८२ एकर जमीन वाटून टाकण्यांत आली आहे. बिहारमध्यें सर्वांत ज्यास्त, म्हणजे २१,४८,१६७ एकर जमिनीचें दान मिळालें. मध्यभारतानें फक्त ५७,९३१ एकर जमीन दिली.

**डेक्कन मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन**—ह्या संस्थेच्या नव्या कार्यकारी मंडळाची निवडणूक झाली आहे. श्री. एम. एम. लोहिया हे अध्यक्ष, श्री. बी. बी. मराठे उपाध्यक्ष, श्री. रामभाऊ सोमाणी सेक्रेटरी व श्री. आर. ए. कुलकर्णी जॉइंट सेक्रेटरी झाले आहेत.

**पश्चिम जर्मनीची युद्धसाहित्याची खरेदी**—प. जर्मनी अमेरिकेकडून येत्या चार वर्षांत १५० कोटी डॉलर्स किंमतीचें युद्धसाहित्य खरेदी करणार आहे. अमेरिकेनें ८३ कोटी डॉलर्सचें साहित्य देणगीदाखल द्यावयाचें ठरविलें आहे, तें निराळेंच.

**ब्रिटिश अधिकाऱ्यांचे पुतळे हालविणार**—स्वातंत्र्य-पूर्व कालांत सार्वजनिक ठिकाणीं पूर्वीच्या ब्रिटिश अधिकाऱ्यांचे जे पुतळे उभारण्यांत आले होते, ते हालवून एका इमारतींत नेऊन ठेवण्याचा निर्णय उत्तर प्रदेश सरकारनें घेतला आहे. त्या इमारतीसाठीं १३ लक्ष रुपयांची योजना करण्यांत आली आहे.

**डॉ. रामन् ह्यांचा गौरव**—सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. सी. व्ही. रामन् ह्यांना रॉयल सोसायटी ऑफ न्यूझीलंडचे ऑनररी फेलो निवडण्यांत आले आहे. सोसायटीचे फक्त ३० ऑनररी फेलो असतात व त्यांत जागा रिकामी झाली, तर सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ त्या जागीं निवडला जातो.

**प. जर्मन बँक रेट**—प. जर्मन बँक रेट ५½% चा ५% करण्यांत आला आहे.

**भारतांत येणारे बडे पाहुणे**—येत्या थंडीच्या मोसमांत भारतांत इंडोनेशियाचे अध्यक्ष डॉ. सुकर्ण, पोलंडचे पंतप्रधान, थायलंडचे पंतप्रधान, एथिओपिआचे बादशहा, सिरिआचे अध्यक्ष, सिलोनचे पंतप्रधान, नेपाळचे पंतप्रधान, अर्ल व लेडी ॲटली, थाइलंडचे परराष्ट्रमंत्री, इत्यादि बडे पाहुणे येणार आहेत.

**इजिप्तला सौदी अरेबियाचें कर्ज**—इजिप्त व ब्रिटन ह्यांच्या-मध्यें सुएझच्या प्रश्नावरून तेढ उत्पन्न झाल्यावर ब्रिटननें इजिप्तची पौंडी गंगाजळी गोठविली आहे. इजिप्तला दुर्लभ परकीय चलनाचा तुटवडा पडूं नये म्हणून अरबस्थानच्या सरकारनें १ कोटी डॉलर्सचें कर्ज देण्याचें ठरविलें आहे. डॉलर्सच्या चलनाचें पौंडाच्या चलनांत इजिप्तला रूपांतर करतां येईल.

**भारत-चीन वैमानिक वहातुक**—भारत व चीन दरम्यान वैमानिक वहातुक सुरू करण्याचा एअर-इंडिया इंटर-नॅशनलचा बेत होता व त्याला चीनची संमतीहि होती. पण, ज्या देशांनीं चिनी सरकारला मान्यता दिलेली नाहीं, अशा देशांच्या नागरिकांची वहातुक चिनी हद्दींतून होण्यास चीननें नकार दिला आहे. त्यामुळें भारत सरकारनें वहातुकीचा बेत तूर्त पुढें ढकलला आहे.

**चहाचा खप वाढला**—भारतांत १९५२-५३ मध्यें १७·५ कोटी पौंड चहा खपला होता; १९५४-५५ मध्यें १८·३ कोटी पौंड चहाचा खप झाला.

**वैमानिक वेगाचा उच्चांक**—कमांडर रॉबर्ट विंडसर ह्या अमेरिकन वैमानिकानें ताशीं १,०१५·४२८ मैल ह्या गतीनें २१ ऑगस्ट रोजीं विमान चालवून, वैमानिक वेगाचा नवा उच्चांक प्रस्थापित केला. ह्यापूर्वीचा सर्वांत जास्त वेग ८२२·३५ मैल होता.

**सुरतनजीक इंडस्ट्रिअल एस्टेट**—सुरतच्या आसमंतांत असलेल्या उधांना ह्या ठिकाणीं इंडस्ट्रिअल एस्टेट स्थापन करण्याची योजना मुंबई सरकारनें मंजूर केली आहे. ती ह्या भागांत जमीन असणाऱ्या मालकांच्या सहकारी संस्थेतर्फे चालविण्यांत येणार आहे. संपूर्ण योजनेसाठीं २ कोटी रुपये लागणार असून मुंबई सरकारनें २० लाख रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे.

**पॉंडेचरी येथें मेडिकल कॉलेज**—पॉंडेचरी येथें मेडिकल कॉलेज स्थापन करण्यासाठीं भारतीय सरकारनें अडीच लाख रुपयांची रक्कम मंजूर केली आहे. चालू वर्षीं फक्त बाराच विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याची सोय आहे. पुढील वर्षापासून मात्र दरसाल ५० विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाची व्यवस्था होईल.

**'ट्यूब वेल्स' खोदण्याची यंत्रसामुग्री**—भारतामधील अमेरिकेच्या प्रतिनिधीनें भारतीय सरकारला १६ लाख रुपये किंमतीची 'ट्यूब वेल्स' खोदण्याची यंत्रसामुग्री दिली आहे. ही मदत भारत व अमेरिका ह्यांच्या दरम्यान ठरलेल्या मदत योजनेप्रमाणें देण्यांत आली आहे.

**गांधीजींच्या आत्मचरित्राचें पर्शिअन भाषांतर**—गांधीजींच्या आत्मचरित्राचें ( दि स्टोरी ऑफ माय एक्सपेरिमेंट्स वुइथ टुथ ) पर्शियन भाषांतर करण्यांत आलें असून तें तेहरान येथें विक्रीस ठेवण्यांत आलें आहे.

**अफगाणिस्तानांत इटालिअन कारखाना**—अफगाणिस्थानांत एक इटालियन कंपनी सिगारेटचा कारखाना उभारणार आहे. त्या संबंधांत अफगाण सरकारशीं करार केला जाईल.

## ' नया पैसा ' नाण्यांतील पोस्टाचे दर

१८९८ च्या इंडियन पोस्ट ऑफीस ॲक्टच्या पहिल्या परिशिष्टांत दुरुस्ती करून हे नवे दर अंमलांत आणण्यांत येणार आहेत.

' नया पैसा ' नाण्यांतील कार्डें, पाकिटें इत्यादींचे दर पुढील-प्रमाणें रहातील.

पत्रें—१ तोळ्याच्या आंत १३ नये पैसे, १ तोळ्यावर प्रत्येक तोळयास वा त्याचा भागास ६ नये पैसे.

कार्डें—एकेरी-५ नये पैसे. जोडकार्ड-१० नये पैसे.

बुकपोस्ट—पहिल्या पांच तोळ्यांपर्यंत ६ नये पैसे. पहिल्या पांच तोळ्यानंतरच्या प्रत्येक २॥ तोळयास वा त्याच्या भागास ३ नये पैसे.

रजिस्टर्ड वृत्तपत्रें—१० तोळ्यांपर्यंत् २ नये पैसे, १० तोळ्यांवर व २० तोळ्यांच्या आंत ३ नये पैसे, २० तोळ्यांवर प्रत्येक २० तोळे वा त्याच्या भागास ३ नये पैसे, एकाच वेष्टनांत एकाच तारखेचे एकापेक्षा अधिक अंक धाडल्यास १० तोळे वजनापर्यंत ३ नये पैसे, १० तोळ्यांवर प्रत्येक ५ तोळ्यांस वा त्याच्या भागास २ नये पैसे, ( हे असे एकाच वेष्टनांत धाडावयाचे अंक एजंटला पोस्टांत मिळतील. घरपोंच होणार नाहींत.

पार्सल—४० तोळ्यांपर्यंत ५० नये पैसे, त्यावर प्रत्येक ४० तोळयास व त्याच्या भागास ५० नये पैसे.

---

**दिल्ली-पंजाबकडे मुंबईहून गहूं**—दिल्ली आणि पंजाब येथें मुंबईहून दररोज एक खास आगगाडी १,००० टन गहूं पोंचता करीत आहे.

**ब्रिटन व फ्रान्स ह्यांचेमध्यें विजेची देवघेव**—ग्रेट ब्रिटन व फ्रान्स ह्यांचेमध्यें विजेची केबल टाकण्याचें काम लवकरच सुरू होऊन १९६० मध्यें तें पुरें होईल. फ्रान्समध्यें हैड्रो-इलेक्ट्रिक वीज असून तिचें उत्पादन कमी-अधिक होतें. उन्हाळ्यांत वीज कमी निर्माण होते; हिवाळ्यांत ती भरपूर असते. ब्रिटनमध्यें कोळसा जाळून वीज निर्माण केली जाते. त्यामुळें तिचा पुरवठा एकसारखा चालू असतो. उन्हाळ्यांत तो पुरवठा मागणीपेक्षा जास्त आणि थंडींत पुरवठ्यापेक्षा मागणी जास्त अशी परिस्थिति असते. ब्रिटन व फ्रान्स ह्या दोन देशांच्या एकत्र पुरवठ्यामुळें दोघांचीहि सोय होईल.

**बॉम्बे स्टेट ट्रान्सपोर्टचा पसारा**—बॉंबे स्टेट रोड ट्रान्सपोर्ट कॉर्पोरेशनचा वाढदिवस नुकताच साजरा झाला. त्यावेळीं, चेअरमन श्री. सरय्या ह्यांनीं माहिती सांगितली कीं कॉर्पोरेशनचा भांडवली खर्च १३९७ लक्ष रु. झाला आहे. तिच्याजवळ ४,३०० गाड्या आहेत व त्या ५४,५४७ मैलांच्या मार्गावरून जातात. कॉर्पोरेशनच्या पटावर २०,००० नोकर आहेत.

**रिक्षावाल्यांचें वय आणि उंची**—मध्यवर्ती सरकारनें रिक्षा ओढणारांसाठी नियम तयार केले आहेत. तो २० ते ४५ वर्षांचा असला पाहिजे, त्याची उंची किमान ५ फूट, ३ इंच हवी व तो वैद्यकीय तपासणींत पास झाला पाहिजे. वेगवेगळ्या राज्यांनीं ह्या नियमांत जरूरीप्रमाणें बदल करावयाचा आहे.

**मुंबई को-ऑपरेटिव्ह ट्रायब्यूनल**—मुंबई सहकारी ट्रायब्यूनलची बैठक अहमदनगर येथें ( नगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी लिमिटेड ) ता. १४ ते १७ सप्टेंबरपर्यंत भरेल.

**राजकीय पक्षांना टाटा कंपनी फंड देणार**—टाटा आयर्न ॲंड स्टील कंपनीनें गेल्या आठवड्यांत एक ठराव करून कंपनीच्या बोर्डाला राजकीय पक्षांच्या फंडांना मदत करण्याचा अधिकार दिला आहे. " जे राजकीय पक्ष उद्योगधंद्यांचें, विशेषतः पोलादाच्या कारखान्यांचें हित पहातील, " अशांना रकमा देणें डायरेक्टर बोर्डाला आतां शक्य होईल. त्याप्रमाणें, कंपनीचा मेमोरॅंडम व आर्टिकल्स ह्यांत बदल करण्यांत आला आहे. " प्रस्तुत ठराव कंपनी कायद्याला धरून आहे; ग्रेट ब्रिटनमध्येंहि असेंच करतात; डायरेक्टरांच्या वैयक्तिक मताप्रमाणें पैसे दिले न जाता, कंपनीचेंच हित पाहिलें जाईल " असें चेअरमन, श्री. जे. आर. डी. टाटा, ह्यांनीं सांगितलें.

---


**धी बॉंबे स्टेट को-ऑपरेटिव्ह बॅंक, लिमिटेड**

## जाहीर खबर

जाहीर करण्यांत येतें कीं, ह्या बॅंकेची ४५ वी वार्षिक साधारण सभा शनिवार दिनांक २२ सप्टेंबर १९५६ रोजीं दुपारीं २ वाजतां ( स्टॅं. टा. ) बॅंकेच्या रजिस्टर कचेरींत ( सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई. ) खालील कामाकरितां भरविण्यांत येणार आहे.

१. ३० जून १९५६ रोजीं संपणाऱ्या वर्षाचे तपासलेले ताळेबंद, नफातोटापत्रक व संचालक मंडळाचा अहवाल स्वीकारणें.

२. नफा वांटणीचा दर जाहीर करणें.

३. हिशेब तपासनिसांची नेमणूक करून त्यांचा मेहनताना ठरविणें.

४. पोटनियम २ ( ई ) व ७२ ची दुरुस्ती करणें.

( सभासदांस दिलेल्या नोटिसींत नमूद केल्याप्रमाणें. )

संचालक मंडळाच्या हुकुमावरून,

मुंबई } वाय्. बी. गायतोंडे.
२८-८-१९५६. } मॅनेजर.

भागाच्या तबदिलीचें काम ( ट्रान्सफर बुकें ) ता. १७-९-१९५६ ते २९-९-१९५६ पर्यंत ( दोन्ही दिवस धरून ) बंद राहील.

डिव्हिडंड मंजूर झाल्यावर तारीख १५-९-१९५६ रोजीं रजिस्टरमध्यें ज्या भागीदारांचीं नांवें दाखल असतील त्यांना सोमवार ता. ८-१०-१९५६ पासून मुंबई ऑफिसमधून त्याची रक्कम दिली जाईल.


---


**सातारा जिल्हा को-ऑ. लॅंड मॉर्गेज बॅंक लि, कराड-सांगली**

**—फक्त सभासदांकरितां—**

## वार्षिक सभेची नोटीस

सदर बॅंकेची २१ वी वार्षिक साधारण सभा शनिवार ता. २२ सप्टेंबर १९५६ रोजीं दुपारीं ३ वाजतां सांगली येथें बॅंकेचे ऑफिसमध्यें भरणार आहे. त्यावेळीं सभेंत सन १९५५-५६ चा अहवाल, ताळेबंद, नफा वांटणी; सन १९५६-५७ चें अंदाजपत्रक; लोकल ऑडिटर्सची नेमणूक करणें; ३१-३-५५ चे ऑडिट-मेमोचा विचार, पोटनियम दुरुस्ती; डायरेक्टरांची निवड, [illegible] कामांचा विचार होणार आहे. तरी सभासदांनीं सभेस [illegible] यावें अशी विनंती आहे.

कराड, ता. } नीलकंठ आण्णाप्पा [illegible]
२१-८-५६ } चेअरमन

# अर्थ

बुधवार, ता. ११ सप्टेंबर, १९५६





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## चीनच्या वायव्येकडील प्रांतांचा विकास

चीन आणि भारत हे आशिआ खंडांतील दोन देश आपआपल्या पद्धतीनें औद्योगिक उत्कर्ष साधण्याची पराकाष्ठा करीत आहेत. तथापि, चीनमधील प्रगतीचा वेग भारतापेक्षा अधिक असून ह्या गोष्टीचे राजकीय व आर्थिक परिणामहि दूरगामी होतील असें मत चाणाक्ष निरीक्षकांनीं व्यक्त केलेलें आहे. चीनचें कम्युनिस्ट सरकार देशाचा औद्योगिक विकास कसा धडाक्यानें करीत आहे ह्यासंबंधीं आणखी नवीन माहिती ‘ रॉयटर ’ ह्या वृत्तसंस्थेनें प्रसिद्ध केली आहे.

वृत्तसंस्थेच्या प्रतिनिधीनें चीनच्या वायव्येकडील कान्सू व सिनकिअँग ह्या प्रांतांचा १५ दिवसांचा दौरा करून ३,००० मैल लांबीचा प्रदेश पायाखाली घातला. ह्या प्रांतांतील खनिज संपत्ति खूपच आहे. अर्थातच तिचें महत्त्व ओळखून चिनी सरकारनें ह्या भागांत भांडवल गुंतविण्याची प्रचंड मोहीम चालू केली आहे. आतांपर्यंत विकासाचें पुष्कळसें काम झालेलें आहेच; पण भावी विकासाच्या प्रचंड योजनांचें आराखडेहि आंखण्यांत येत आहेत. एखादी लष्करी मोहीम धार्मिक भावनेनें व उत्साहानें चालविण्यांत यावी, त्याप्रमाणें चीनचें सरकार वागत आहे. हे दोन्ही प्रांत सोव्हिएट रशिआच्या सरहद्दींना लागून आहेत. तथापि, तेथील सर्व विकासयोजनांच्या कामावर चीनच्या मध्यवर्ती सरकारचें प्रत्यक्ष वा परिणामकारक नियंत्रण आहे. राजकीय जीवनहि ह्या नियंत्रणाच्या कक्षेंतून सुटलेलें नाहीं. ठिकठिकाणीं रशिअन सल्लागार दिसून येतात आणि बरीच रशिअन यंत्रसामुग्रीहि वापरण्यांत येत असलेली दिसते. पण रशिअन तज्ज्ञांची संख्या चीनमधील इतर भागांतल्या इतपतच येथें आहे. सर्वत्र चीनचे अधिकारीच हुकमत गाजवितांना दिसतात. तांत्रिक बाबी सोडून रशिअन सल्लागारांची उपस्थिति मुळींच जाणवत नाहीं. ह्या दोन्हीं प्रांतांत तेलाच्या विहिरी खोदणें, सडका तयार करणें, रेल्वेचे रस्ते बांधणें, नवीन कारखाने व गांवें स्थापन करणें, ह्यासारखीं कामें झपाट्यानें चालू आहेत. तरुण लोकांना तर अपूर्व संधि मिळाल्यासारखें झालें आहे. हजारो तरुण गटागटांनीं पश्चिमेकडे प्रयाण करीत आहेत. वयस्कर माणसेंहि ह्या प्रवाहांत सामील झालेलीं दिसत आहेत. चीनचा हा प्रदेश डोंगराळ असून शिवाय वाळवंटांनीं युक्त असा आहे. अशा प्रदेशांत लोकवस्ती अर्थातच फार विरळ आहे. सध्यां चीनमधील इतर प्रांतांमधून तिकडे माणसांचा मोठा लोंढाच वहात आहे असे म्हणण्यास हरकत नाहीं. निर्जन व रुक्ष अशा ह्या प्रदेशाचा औद्योगिक विकास योजल्याप्रमाणें झाला तर चीनच्या आर्थिक जीवनांतील ती सर्वांत महत्त्वाची घटना ठरल्याशिवाय रहाणार नाहीं.

चीनच्या पूर्वेकडील प्रांतांतूनच बहुतेक वसाहतवाले पश्चिमेकडे जात आहेत. तुम्ही आपला प्रांत सोडून इतक्या दूरवर कां जातां म्हणून त्यांना प्रश्न केला तर ते स्पष्टपणें असें सांगतात कीं नवीन प्रांतांत गेलों तर आम्हांला अधिक चांगल्या नौकऱ्या मिळतील आणि आमची आर्थिक भरभराट होईल. तथापि नुसतीं माणसें पाठवून भागत नाहीं हें ओळखून चीनच्या सरकारनें यंत्रसामुग्रीहि मोठ्या प्रमाणावर पाठविण्यांत कसूर केलेली नाहीं. चीनच्या वायव्य प्रांताकडे जाणारे रस्ते पुष्कळदां मोटार-लॉऱ्यांच्या रांगांनीं अडविलेले दिसतात. ह्या मोटारींच्या पथकांतून सर्व प्रकारची यंत्रसामुग्री जरूर त्या ठिकाणीं वाहून नेण्यांत येत असते. तथापि आपल्याजवळ असलेल्या अफाट मनुष्यबळाचाहि चीनचें सरकार नाना प्रकारांनीं उपयोग करून घेत आहे.

---

## भारतांत १०,१९ कोटि रुपये वसूल–भांडवलाच्या ३०,३८१ कंपन्या

### १९५५–५६ मध्यें १४४८ नव्या कंपन्या

भारतांत १९५५–५६ मध्यें १,४४८ नव्या कंपन्या स्थापन झाल्या आणि त्या वर्षाच्या अखेरीपर्यंत त्यांच्या वसूलभांडवलाची एकूण रक्कम ३,१४ लक्ष रुपये झाली. याच मुदतींत ८४६ कंपन्यांनीं आपले व्यवहार गुंडाळले. त्यांचें वसूल–भांडवल १०,६९ लक्ष रुपये होतें. विद्यमान कंपन्यांच्या एकूण वसूल–भांडवलांत ४३,७२ लक्ष रुपयांची वाढ झाली.

१९५५–५६ च्या आर्थिक वर्षाच्या अखेरीस चालू जॉइंट स्टॉक कंपन्यांची एकूण संख्या ३०,३८१ होती व त्यांचें एकूण वसूल–भांडवल १०,१९कोटी रुपये होतें. कंपनी कायदा कारभार-विभागानें प्रसिद्ध केलेल्या पत्रकांत ही माहिती देण्यांत आली आहे. तथापि, कांहीं कंपन्यांनीं आपले व्यवहार गुंडाळलेले असून त्यांच्यासंबंधींची माहिती रजिस्ट्रारांकडून अद्याप हातीं यावयाची असल्यानें, कदाचित् कंपन्यांची ही संख्या किंचित् कमी होण्याचा संभव आहे. तसेंच, व्यवहार गुंडाळलेल्या कंपन्या व कंपन्यांच्या भांडवली परिस्थितींतील फरक याबाबतचा अहवाल उशिरां समजल्यामुळें कंपन्यांच्या अंदाजें १०,१९ कोटी रुपयांच्या एकूण वसूल–भांडवलाच्या रकमेंतहि बदल होईल.

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या मुदतींत चालू कंपन्यांच्या एकूण संख्येंत १८०० वर कंपन्यांची भर पडली. याच कालावधींत एकूण वसूल–भांडवलहि २,४४ कोटी रुपयांनी वाढलें.

### नवी नोंदणी

१९५५–५६ मध्यें १४४८ नव्या कंपन्या नोंदविण्यांत आल्या. १९५१–५२ मधील ही संख्या १८६६ होती. त्यानंतरच्या काळांतील वर्षांत सदर वर्षांतील नोंदणीसंख्या सर्वांत मोठी आहे. १९५४–५५, १९५३–५४, १९५२–५३ या वर्षांतील नोंदविलेल्या नव्या कंपन्यांची संख्या अनुक्रमें १२०३, ११९३ व १३३३ अशी आहे.

१९५५–५६ च्या आर्थिक वर्षांत प्रक्रिया आणि उत्पादन ( प्रोसेसिंग ॲण्ड मॅन्युफॅक्चरिंग ) विभागांतील व व्यापार ( ट्रेड

ॲण्ड फायनान्स ) विभागांतील नव्या कंपन्यांची संख्या अनुक्रमें ५३६ व ५२८ अशी असून त्यांचें एकूण वसूल-भांडवल अनुक्रमें १०,९१७ लक्ष रुपये व २,९०६ लक्ष रुपये असें होतें. एकूण नव्या कंपन्यांच्या संख्येचा व अधिकृत भांडवलाचा विचार करतां या गटांतील नव्या कंपन्यांची संख्या ७३ टक्के असून अधिकृत भांडवल ८८ टक्के आहे.

पुनर्विलोकनाच्या वर्षांत नोंदविलेल्या नव्या कंपन्यांपैकी सर्वांत जास्त म्हणजे ५३३ कंपन्या प. बंगालमध्यें नोंदविण्यांत आल्या. त्याखालोखाल मुंबई २५२, मद्रास १९२, आणि दिल्ली १३९ अशी नोंदणी झाली. या चारी राज्यांतील नोंदविलेल्या नव्या कंपन्यांची संख्या १११६ म्हणजे एकूण नव्या कंपन्यांच्या संख्येच्या ७७ टक्के आहे. कंपन्यांच्या नोंदणीबाबत त्रावणकोर, कोचीन, उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश, पंजाब यांचा त्यानंतर उल्लेख करतां येईल. या राज्यांतील ह्या संख्या अनुक्रमें ६१, ४०, ३९ व ३० अशा आहेत.

### मोठ्या कंपन्या

या वर्षांत एक कोटी रु. व त्याहून अधिक अधिकृत भांडवल असलेल्या मोठ्या कंपन्यांची संख्या २६ आहे. गतवर्षी हा आंकडा ४२ होता. या वर्षीच्या मोठ्या कंपन्यांत नांगल फर्टिलायझर्स अँड केमिकल्स, इंडियन व्हिसकोस कॉर्पोरेशन, हिंदुस्थान व्हिइकल्स, डालमिया आयर्न अँड स्टील, सहाया प्रॉपर्टीज अँड इन्व्हेस्टमेंट, अरिक इंडस्ट्रीज व साहू ग्लास कंपनीज यांचा समावेश होतो. पैकी पहिल्या दोन कंपन्यांचें अधिकृत भांडवल अनुक्रमें २० कोटी व १० कोटी रुपये आहे तर बाकीच्या कंपन्यांचें प्रत्येकी ५ कोटी रु. आहे. कमर्शियल प्रिंटिंग प्रेस, गोल्डन टोबॅको कंपनी, अरिक इंडस्ट्रीज, सहाया प्रॉपर्टिज अँड इन्व्हेस्टमेंट आणि नांगल फर्टिलायझर्स अँड केमिकल्स या पांच कंपन्या वगळतां बाकी सर्व कंपन्या सार्वजनिक आहेत. या २६ कंपन्यांपैकी ४ सिमेंट कंपन्या, ४ गिरणी कापडविषयक कंपन्या, ४ रसायनें तयार करणाऱ्या, २ लोखंड व पोलादाच्या व बाकीच्या साखर, सायकली, कांच, कागद, तंबाखू, रासायनिक खतें औद्योगिक रसायनें इत्यादि तयार करणाऱ्या आहेत.

या वर्षांत २७० लाख रु. वसूलभांडवलाच्या ३८४ म्हणजे सर्वांत अधिक कंपन्या बुडाल्या. त्यांची नोंद 'इंडस्ट्रियल ग्रुप कॉमर्स (ट्रेड अँड फायनान्स)' या विभागांत करण्यांत आली आहे.

सर्वांत अधिक कंपन्या मुंबई राज्यांत (१५४) बुडाल्या. त्यानंतर दिल्लीचा क्रम (१३१) लागतो.

### कंपन्यांच्या वसूल भांडवलांतील निव्वळ वाढ

१९५५-५६ च्या आर्थिक वर्षांत कंपन्यांच्या वसूल भांडवलांतील निव्वळ वाढ ३६, १७ लक्ष रुपयांची असून त्यांपैकी ३१४ लक्ष रुपये चालू वर्षांतील नव्या कंपन्यांचे आहेत. सोन्याच्या खाणी, धुण्याच्या साबणाच्या उत्पादनाचा धंदा, मोटारवाहतूक याबाबतच्या कंपन्या आणि विमान कंपन्या ह्यांच्या वसूल भांडवलांत अनुक्रमें ४८ लक्ष रु, ३७ लक्ष रु., ८५ लक्ष रु. आणि २३५ लक्ष रुपयांनीं घट झाली. वसूलभांडवलाच्या वाढीपैकी सुमारें ६० टक्के वाढ मुंबई राज्यांत झाली असून १५ टक्के वाढ प. बंगालमध्यें झाली.

---

दि बेळगांव [illegible] लिमिटेड
स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक
दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील
पहिली शेड्यूल्ड बँक
शाखा:—१ संकेश्वर, २ होसूर बेळगांव, ३ गोकाक, ४ जयसिंगपूर, ५ वेंगुर्ला, ६ मालवण, ७ नंदगड, ८ गडहिंग्लज, ९ रामदुर्ग, १० चिक्कोडी, ११ सौंदत्ती, १२ बेळगांव, १३ नरगुंद, १४ शिरोडा, १५ चिपळूण, १६ कणकवली, १७ निपाणी, १८ बैलहोंगल, १९ मिरज, २० अथणी, २१ देवगड, २२ ठळकवाडी बेळगांव, २३ सावंतवाडी, २४ बार्शी.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. | २,४६,००० |
| ठेवी | रु. | १,०५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,२०,०,०००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतींत अद्ययावत् पद्धतीचा सेफ डिपॉझिट व्हॉल्ट ता. १०।४।१९५३ पासून सुरू आहे. ता. १।९।५४ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टमधील लॉकर्सचे दर लोकांचे खास सोयीकरितां कमी केले आहेत. तरी सर्वांनीं व्हॉल्टला एक वेळ भेट देऊन, सवलतीचे दराचा अवश्य फायदा घ्यावा.
सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

स्थापना सन १९३५ टे. नं. ३४५१८
दि मराठा मार्केट पीपल्स
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सिताराम बिल्डिंग, क्रॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | | |
|---|---|---|
| संकल्पित भांडवल | रु. | १,००,००० |
| जमा भांडवल | रु. | ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. | ९०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. | ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. | ९,००,००० ,, |

☆ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ☆
श्री. खं. सा. दौंडकर, एम्. ए., एलएल. बी., (अध्यक्ष)
श्री. रा. सा. भ. ना. ढोबळे, ( उपाध्यक्ष )
श्री. उ. भा. तांबे, ( मॅनेजिंग डायरेक्टर )
श्री. म. मा. वामन, श्री. गे. गो. टोले,
श्री. खं. स. काळे, श्री. गे. ल. नलवडे,
श्री. म. बा बेंडे, श्री. ज्ञा. मा. मनसूख.
डायरेक्टर्स.
सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार [illegible]

## द्वितीय पंचवार्षिक योजनेंत सहकारी शिक्षणाचें स्थान

लेखक :—श्री. ल. का. कुलकर्णी, बी. ए.
C/o को-ऑप. ट्रेनिंग कॉलेज, पुणें १.

### प्रास्ताविक

भारताची पहिली पंचवार्षिक योजना ३१ मार्च १९५६ ला पूर्ण झाली व दुसऱ्या पंचवार्षिक योजनेस सुरुवात झाली. १९७७ सालापर्यंत अशा प्रकारच्या पंचवार्षिक योजना आंखण्यांत येणार आहेत. एकूण पंचवीस वर्षांचे कालावधींत भारताची सर्वांगीण उन्नति व औद्योगिक प्रगति करण्याचा मानस आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अनेक उद्दिष्टांपैकी शेतीमालाचें उत्पादन वाढविणें व त्याबरोबर सर्वसामान्य माणसाचें राहणीमान सुधारणें हें एक प्रमुख अंग आहे. भारताच्या सुमारें ३६ कोटी लोकसंख्ये-पैकीं ३० कोटी लोकसंख्या ग्रामीण विभागांत रहात आहे. तिचें रहाणीमान अत्यंत खालच्या पातळींचें आहे. भारताच्या आर्थिक सुरक्षिततेसाठीं हें रहाणीमान द्रुतगतीनें सुधारणें आवश्यक आहे. त्यासाठीं सहकारी कार्यपद्धतीचा अवलंब करावयाचा आहे. आपल्या समाजरचनेंत सहकाराला महत्त्वाचें स्थान प्राप्त झालेलें आहे. समाजवादी अर्थरचना प्रस्थापित करण्यासाठीं सरकार सहकारी संस्थांत भागीदारी पद्धतीनें (State Partnership) भाग घेत आहे. दलालवर्गाकडे जाणारा नफ्याचा ओघ हळूं हळूं सामान्य ग्राहकाकडे वळवीत आहे. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या अखेरीस ५० टक्के खेडीं व ३० टक्के लोकसंख्या सहकारी कार्य-क्रमाखालीं आणावयाची आहे. त्यासाठीं ४७ कोटी रुपयांची तरतूद योजनेंत आहे. (रिझर्व्ह बँकेची मदत शिवाय वेगळी आहेच.) प्राथमिक सहकारी सभासदांची संख्या दीड कोटीवर न्यावयाची आहे. १०४०० मोठ्या पतपेढ्या स्थापन करावयाच्या आहेत. १,७०० मार्केटिंग सोसायट्या, ३५० वेअरहाऊसेस, १,७०० मार्केटिंग सोसायट्यांचीं गुदामें व ५,००० मोठीं गुदामें उभारावयाचीं आहेत. इत्यादि अनेक योजनांची तरतूद करण्यांत आलेली आहे.

### सहकारी शिक्षणाची आवश्यकता

वरील योजना पाहिल्यानंतर सहकारी कार्यक्रमासाठीं किती मनुष्यबळ लागेल याची कल्पना येऊं शकेल. यंत्रसामुग्री व सरकारी यंत्रणा राबविली जाईल; परंतु त्यासाठीं अनुभवी व माहितगार नोकरवर्गाची आवश्यकता आहे. नोकरवर्ग कार्यक्षम नसेल, व सहकारी कार्यपद्धतीचें शिक्षण घेतलेला नसेल तर योजना यशस्वी होऊं शकणार नाहींत. सरकारचा पैसा अनाठायीं खर्च होईल अशी सरकारला भीति वाटते. म्हणूनच सरकारनें सहकारी शिक्षणावर भर देऊन प्रमुख ठिकाणीं शिक्षणकेंद्रें स्थापन केलीं आहेत. जरूर त्या सवलती देऊन सहकारी यंत्रणेसाठीं कार्यक्षम मनुष्यबळ तयार केलें जात आहे. त्याची थोडक्यांत माहिती देणें इष्ट वाटल्या-वरून येथें देण्यांत येत आहे. सहकारी क्षेत्रांतील व्यक्तींस त्याचा उपयोग होईल अशी खात्री वाटते.

### मध्यवर्ती सहकारी शिक्षणसमिति

नियोजन मंडळाला सहकारी शिक्षणाची आवश्यकता व निकड किती आहे हें पटल्यावरून पहिल्या पंचवार्षिक योजनेंत त्यासाठीं दहा लाख रुपयांची तरतूद केली होती. भारत सरकार व रिझर्व्ह बँक यांच्या विचारविनिमयानंतर १९५३ च्या नोव्हेंबर महिन्यांत सहकारी शिक्षणासाठीं एक मध्यवर्ती समिति (Central Com-mittee) स्थापन करण्यांत आली व त्या समितीकडे अखिल भारतीय सहकारी शिक्षणक्रमाचीं सर्व सूत्रें देण्यांत आलीं. माननीय श्री. वैकुंठभाई मेहता हे या समितीचे चेअरमन आहेत. मध्यवर्ती समिति स्थापन करण्यापूर्वीं १९५२ सालीं रिझर्व्ह बँकेनें एक पुस्तिका प्रसिद्ध केली होती व त्यांत को-ऑप. ट्रेनिंग कॉलेज, पुणें येथें कोणतें शिक्षण दिलें जातें व काय सवलती मिळतात याविषयीं माहिती दिली होती. नंतर १९५४ सालीं अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा पहाणी-समितीचा अहवाल प्रसिद्ध झाला. समितीच्या बहुतेक शिफारशी अंमलांत आणण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे. सहकारी शिक्षणाचा कार्यक्रम त्या-पैकींच आहे. या अहवालानंतर रिझर्व्ह बँकेनें आपल्या धोरणांत बदल केला. सरकारचे सहकार्यानें मध्यवर्ती समिति स्थापन करण्यांत आली. ह्या समितीवर सहकारी शिक्षण, योजना आणि संघटना याबाबत सरकारनें जबाबदारी टाकलेली आहे.

सहकारी शिक्षणक्रमाचे तीन प्रमुख विभाग पाडण्यांत आलेले आहेत. (१) वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठीं एक (२) दुय्यम अधि-काऱ्यांसाठीं एक आणि (३) कनिष्ठ नोकरवर्गासाठीं एक असे तीन प्रकारचे अभ्यासक्रम आहेत. पहिल्या दोन अभ्यासक्रमांसाठी मध्यवर्ती समिति ही रिझर्व्ह बँकेची समिति म्हणून काम पहात आहे आणि तिसऱ्या अभ्यासक्रमासाठी भारत सरकारची समिति म्हणून काम पहात आहे.

### रिझर्व्ह बँकेचें कार्य

या सहकारी शिक्षणासाठीं रिझर्व्ह बँकेला खर्चाचा फार मोठा बोजा सहन करावा लागतो. दरवर्षी सुमारें ५ ते ७ लाख रुपये त्यासाठीं खर्च करावे लागतात. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया व इंपीरियल बँक (स्टेट बँक ऑफ इंडिया) यांचें राष्ट्रीयीकरण केल्यानंतर त्यांच्या निधींचा उपयोग सरकार ग्रामीण पतपुरवठ्या-कडे करून घेणार हें उघडच होतें. वास्तविक त्यासाठींच त्यांचें राष्ट्रीयीकरण करण्यांत आलें. स्टेट बँक→सेंट्रल बँक (जिल्हानि-हाय)→सहकारी पतपेढी→शेतकरी किंवा धंदेवाईक अशी पत-पुरवठ्याची साखळी आहे. रिझर्व्ह बँकेचा पैसा सहकारी यंत्रणेंतून शेवटीं शेतकऱ्याच्या आणि धंदेवाल्याच्या हातांत पडणार असल्या-कारणानें त्यावर कडक नियंत्रण ठेवणें रिझर्व्ह बँकेला क्रमप्राप्त झालें. त्यानुसार बँकेच्या कायद्यांत योग्य त्या सुधारणा करण्यांत आल्या आणि सहकारी यंत्रणेसाठीं लायक नोकरवर्गाला द्याव्या लागणाऱ्या शिक्षणासाठीं खर्चाची तरतूद रिझर्व्ह बँकेला करावी लागली. खालीलपैकीं पहिल्या दोन अभ्यासक्रमाचा सर्व खर्च रिझर्व्ह बँकेला सोसावा लागतो.

### अभ्यासक्रम : संक्षिप्त माहिती

**(१) वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठीं** (Senior Officers' Training Course):—असि. रजिस्ट्रार्स, डेव्हलपमेंट ऑफिसर्स, बँक मॅनेजर्स, इत्यादींना या वर्गांत शिक्षणासाठीं पाठविलें जातें. शिक्षणक्रम सहा महिन्यांचा आहे. यांपैकीं २ महिने प्रात्यक्षिक शिक्षणासाठीं जावें लागतें. भारतांत फक्त पुणें येथील को-ऑप. ट्रेनिंग कॉलेजमध्यें या वर्गाची व्यवस्था करण्यांत आली आहे. उमेदवारांना दरमहा ७५ रुपये विद्यावेतन (स्टायपेंड) मिळतें. फिरतीचे वेळीं रु. १५० मिळतात. शिवाय प्रवासखर्च वगैरे मिळतो. एका वेळीं ३५ ते ४० उमेदवार शिकवून तयार केले जातात.

**(२) दुय्यम अधिकाऱ्यांसाठीं** (Intermediate Grade Officers' Training Course) बँक मॅनेजर्स, डिस्ट्रिक्ट को-ऑप.

ऑफिसर्स, डिस्ट्रिक्ट ऑडिटर्स, इत्यादींना या वर्गांत शिक्षणासाठी पाठविलें जातें. शिक्षणक्रम बारा महिन्यांचा आहे. पैकी २ महिने प्रात्यक्षिक शिक्षण घ्यावें लागतें. भारतांत पांच ठिकाणीं (१ पुणें, २ मद्रास, ३ रांची, ४ मीरत, व ५ इंदोर) वर्ग चालविले जातात. उमेदवारांना दरमहा ५० रुपये व फिरती वेळीं १२० रु. विद्यावेतन मिळतें व प्रवासखर्च व इतर सवलती मिळतात. एका केंद्रांत एका वेळीं ४० ते ४५ उमेदवारांना शिक्षण दिलें जातें.

(३) कनिष्ठ अधिकाऱ्यांसाठी (Subordinate Co-op. Personnel) या वर्गांत सेक्रेटरी, इन्स्पेक्टर्स, ऑडिटर्स, इत्यादींना शिक्षण मातृभाषेंतून दिलें जातें. शिक्षणक्रम ६ ते ८ महिन्यांचा असतो. उमेदवारांना दरमहा ४० रुपये व प्रात्यक्षिक शिक्षणाचे वेळीं ६० रुपये विद्यावेतन मिळतें. भारतांत प्रत्येक राज्यांत प्रादेशिक सहकारी विद्यालय स्थापन करण्यांत आलें आहे. एकूण संख्या ३१ करावयाची आहे. या विद्यालयांचा खर्च मध्यवर्ती सरकार व प्रादेशिक सरकार निम्मानिम करणार आहे.

याशिवाय ब्लॉक लेव्हल को-ऑपरेटिव्ह ऑफिसर्सकरितां एक शिक्षणक्रम आहे. भारतांत (१) गोपालपूर (२) हैद्राबाद (३) तिरुपती (४) कोटा (५) भावनगर (६) धुरी (७) फैजाबाद व (८) कल्याणी या आठ ठिकाणीं शिक्षणकेंद्रें स्थापन करण्यांत आलेलीं आहेत.

तसेंच सहकारी क्षेत्रांत काम करणाऱ्या बिनसरकारी अधिकारी-व्यक्तींसाठी वर्ग चालविले जातात. बँकेचे आणि सोसायट्यांचे चेअरमन व इतर पदाधिकारी यांचा यांत समावेश होतो.

या सर्व विवेचनावरून भारत सरकार सहकारी शिक्षणासाठी किती जागरूकतेनें लक्ष घालीत आहे याची कल्पना येईल. समाजवादी अर्थरचनेसाठी सरकारनें सहकारी संस्थांशीं हातमिळवणी केलेली आहे व जरूर तें आर्थिक साहाय्य देऊं केलेलें आहे. स्वतंत्र भारतांतील जागरूक जनतेनें याचा योग्य तो उपयोग करून घेतला पाहिजे व भारतांत आर्थिक स्थैर्य निर्माण करण्यासाठी झटलें पाहिजे.

## भारतीय आयुर्विमा कॉर्पोरेशन

दि. १९ जानेवारी १९५६ रोजीं राष्ट्रपतींनीं दि इन्शुरन्स (इमर्जन्सी प्रोव्हिजन्स) ऑर्डनन्स जारी के भारतांतील सर्व आयुर्विमा व्यवसाय सरकारी व्यवस्थे आणला. या अंमलबजावणीमुळें, आयुर्विम्याच्या व भारतीय व परदेशीय, लहानमोठ्या मिळून १८० विमा कं चा व ७० प्रॉ. सोसायट्यांचा कारभार सरकारच्या हंगामी काळापुरता म्हणून आला. त्या सर्वांचा चालू व्यवसाय सुमारें १,२५० कोटी रु. चा व एकूण निधि कोटी रुपयांचा होता.

या सर्व कंपन्यांचा कारभार चोख रीतीनें चालविण जबाबदारी आतां सरकारवर पडली. वटहुकुमांत म्हटल्याप्र सरकारकडे या सर्व कंपन्यांची फक्त व्यवस्था आली, मा नव्हे; आणि म्हणून त्यांचा कारभार पृथक् कंपन्या या दृष्ट चालविणें जरूर होतें. हें काम सुव्यवस्थित व्हावें म सरकारच्या वतीनें काम पाहण्याकरितां कस्टोडियन नेमण आले. या हंगामी काळांत कस्टोडियनांच्या कामांत एकसू आणणें ही गोष्ट खरोखरच मोठी कठीण होती. कारण, व्यव पाहावयाच्या कंपन्यांची अंतर्गत व्यवस्था भिन्न प्रकारची हो त्यांचा विस्तारहि लहानमोठा व स्वरूपहि भिन्न अशी सि होती. कांहीं कंपन्या तर नादारींत निघालेल्या होत्या आणि उ बाबतींत कोणत्या पायावर विमा रकमेचे हक्क मंजूर करण यावेत याबाबत निर्णय घेणें जरूर होतें. ज्यांची स्थि संशयास्पद होती अशा कंपन्यांच्या प्रकरणीं लवकर चौक करून चालू विमेदारांचे हक्क लक्षांत घेतां देणेकऱ्यांची देण्या जबाबदारी किती प्रमाणांत स्वीकारतां येईल तें पाहणें जरूरी होतें. परंतु या बिकट संक्रमणकाळांत व अशा बाबतींत अ रिहार्य असलेल्या अस्थिर स्थितींतहि विम्याचें नवीन क समाधानकारक प्रमाणांत मिळत आहे ही अत्यंत समाधाना बाब आहे.

या कंपन्यांची व्यवस्था पाहण्याबरोबरच विम्याचें राष्ट्रीयीकर करण्याच्या सरकारच्या निर्णयास संसदेकडून संमति मि


## कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

श्री. श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ" ह्यांचें हें पुस्तक अत्यंत लोकप्रिय झालें. त्याच्या २ वर्षांत ४ ( २ मराठी व २ गुजराती ) आवृत्त्या निघाल्या.

— आतां, श्री. काळे ह्यांचें —

# "पुढे पाऊल"

प्रसिद्ध होत आहे. ☆ पृ. सं. १३१. ☆ किं. २ रु.

व्यक्ति, कुटुंब व समाज ह्यांच्या गरजांचा व हितसंबंधांचा मेळ घालून सुख-संपदेंत भर कशी घालतां येईल आणि जीवन कसें सुधारतां येईल ह्याचें चित्ताकर्षक विवेचन.

याची जबाबदारीहि सरकारवर होती. त्या वटहुकुमावर देनें विचारविनिमय करून सरकारच्या निर्णयास पाठिंबा दिला. नंतर लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन बिल संसदेंत विचारासाठी ठे. त्या बिलाचा अधिक विचार करण्यासाठी नेमलेल्या केत्सा समितीनें या प्रश्नांत गुंतलेल्या सर्व विवाद्य व कठीण ॉवर सविस्तर चर्चा केली. चिकित्सा समितीच्या अहवालाचा ार झाल्यावर शेवटीं संसदेंत लाइफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन यदा पसार झाला.

कायदा संमत झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्याचें अंगावर पडलें सरकार ठरवील त्या दिवसापासून कॉर्पोरेशन तित्वांत यावें अशी तरतूद त्या कायद्यांत करण्यांत आलेली . अवश्य त्याहून अधिक काळ या कंपन्यांची व्यवस्था ारनें आपल्याकडे न ठेवतां यापुढील बिकट समस्या सोड- यासाठी कॉर्पोरेशनची स्थापना शक्य तितक्या लवकर करण्यांत असेंच सरकारला वाटत होतें. तद्नुसार दि. १ सप्टेंबर या ीं आयुर्विमा कॉर्पोरेशन अस्तित्वांत यावें असें ठरविण्यांत . हा निर्णय घेतल्यामुळें अवश्य ती पूर्वतयारी फारच या अवधींत करण्याची जबाबदारी येऊन पडली. हें काम तर च बिकट होतें. कारण ही पूर्वतयारी म्हणजे विमा- दनाच्या नमुन्यासुद्धां किती तरी छोट्या छोट्या गोष्टींपासून विभाग-कचेऱ्यांची जागा निवडण्यापर्यंत अनेक कामें पार वयाचीं होतीं.

या कॉर्पोरेशनच्या कामासाठी देशाचे पांच भाग पाडण्यांत न त्यांच्या मुख्य कचेऱ्या मुंबई, कलकत्ता, मद्रास, दिल्ली व पूर या पांच ठिकाणीं राहतील असें कायद्यांत नमूद केलेलें आहे. ग-कचेऱ्या कोठें ठेवाव्यात याबद्दल खूप विचार केला. कचेऱ्यांचें कामकाज आतांपर्यंतच्या विमा कंपन्यांच्या केंद्र- ालयाप्रमाणेंच चालेल. ठिकाणांची निवड करतांना, त्या कचे- ऱ्या कार्यक्षेत्राखालीं येणारा प्रदेश व नवीन काम मिळण्याची ता किती, या गोष्टी विशेषत्वें लक्षांत घेतल्या. विभाग ऱ्यांची संख्या तर भरपूर असावी परंतु त्याचबरोबर खर्चाचें हि कमींत कमी रहावें या दोन्ही गोष्टींचा मेळ बसवावयाचा तर सुरुवातीला देशभर मिळून ३३ विभाग कचेऱ्या ्यात असा निर्णय सरकारनें घेतला. या कचेऱ्यांच्या हाता- सुमारें १८० शाखा-कचेऱ्यांचें जाळें राहील. यामुळें विमेदार हि राहात असला तरी त्याच्या राहण्याच्या ठिकाणापासून ारेशनची कोणती ना कोणती कचेरी फार दूर राहणार नाहीं. गीय शाखा कचेऱ्यांच्या या जाळ्यामुळें कॉर्पोरेशन विमे- ंची सेवा तत्परतेनें व कार्यक्षम रीत्या करूं शकेल अशी ा आहे.

ा कचेऱ्यांचें काम ठरविलेल्या दिवशीं सुरू करावयाचें तर मिक स्वरूपाचें खूप काम करणें जरूर होतें. कार्यालयांतील ्कामकाजाची सर्वांगीण पाहणी करण्यांत आली व तद्विषयक ावलि तयार करण्यांत आली. हिशेबाचे नवीन तक्ते तयार करण्यांत आले. इतर तक्त्यांचे नमुनेहि तयार करण्यांत आले. विशेषत्वें नवीन आवेदनपत्राचा नमुना खूप विचार करून नक्की करण्यांत आला.

### चालू विमापत्रें

सध्यां चालू असलेल्या सुमारें ५० लक्ष विमापत्रांकडे लक्ष देण्याची व्यवस्था करणें हा आणखी एक कठीण प्रश्न होता. आतांपर्यंत विमा कंपन्यांच्या कामांत फार केंद्रीकरण झालेलें होतें. बहुतेक सर्व काम केंद्र-कार्यालयांत होई व शाखा-कचेऱ्या बहुधा फक्त नवीन विमा व्यवसाय मिळविण्याकडे लक्ष देत. परंतु वर उल्लेखिलेल्याप्रमाणें विभाग-कचेऱ्यांनीं विमापत्रांकडे लक्ष देण्याचें सर्व काम करावें अशी अपेक्षा असल्यामुळें सुमारें २५० विमा कंपन्यांच्या या विमापत्रांची विभागवार वांटणी करण्याचें प्रचंड काम हातावेगळें करणें जरूर झालें. हिशेबाचें प्रत्येक पुस्तक व नोंदवही नीट पाहून ज्या विभाग-कचेरीच्या कक्षेंत विमेदार राहात असेल तद्नुसार नवीन पुस्तकांत त्यांची नोंद करणें, हीं कामें करावयाचीं होतीं. विमेदारांकडे लक्ष देण्याच्या कामांत खंड पडूं नये म्हणून हें काम कांहीं महिन्यांत हळूहळू करण्यांत यावें असें ठरविण्यांत आलें. विभागवार नवीन नोंद-पुस्तकें वगैरे तयार झाल्यानंतर हीं सर्व कागदपत्रें व तीं पाहणारा नोकरवर्ग त्या त्या विभाग-कचेरींत बदलण्यांत येतील. दरम्यानच्या काळांत, पूर्वीं केंद्र कार्यालयें असणाऱ्या कचेऱ्यांचें कामा-योग्य गट तयार करण्यांत आले आहेत. सर्व कागदपत्रें त्या त्या विभाग-कचेरींत हलविण्याचें कामहि लवकरच पुरें होईल अशी आशा आहे. नवीन विम्यांच्या बाबतींत विभाग-कचेऱ्या प्रथमपासूनच लक्ष देऊं लागतील. असें असल्यामुळें विभाग कचेऱ्यांच्या ठिकाणीं कांहीं नोकरवर्गाची बदली करावी लागली आहे. कांहींजण यावेळपावेतों नवीन जागीं रुजू झाले असून विकेंद्रीकरणाचें काम पुरें होईल तोंपर्यंत इतरहि आपापल्या नव्या जागीं रुजू होतील.

कॉर्पोरेशनच्या नोकरवर्गाचा प्रश्नहि बिकट स्वरुपाचा आहे. या सर्व कंपन्यांत पूर्ण वेळ काम करणाऱ्या नोकरांची संख्या सुमारें २७,००० आहे. यांपैकी बहुसंख्य नोकर मुंबई, मद्रास, दिल्ली व कलकत्ता या चार शहरीं आहेत. या चार केंद्रांतच बहुतेक केंद्र-कार्यालयांची दाटी होती. असें असल्यामुळें नवीन विभाग कचेऱ्या जेथें उघडावयाच्या त्या ठिकाणीं केंद्र कार्या-लयाच्या कामासाठी तरबेज, पुरेसा नोकरवर्ग मिळणें कठीण काम होतें. याखेरीज उत्तरप्रदेश व संकल्पित मध्य प्रदेश मिळून व्हावयाच्या मध्य भागांत फारच थोड्या कंपन्यांची केंद्र-कार्या-लयें होतीं. त्यामुळें या भागांत तर अवश्य त्या तरबेज नोकरांची फारच उणीव जाणवत आहे. उलट, देशांतील निम्मा विमा व्यवसाय मिळणाऱ्या मुंबई भागांत तर नव्या व्यवस्थेमुळें जरूरीपेक्षा अधिक तरबेज नोकरवर्ग उपलब्ध आहे. यामुळें मुंबईतून मध्य-भागांत कांहीं नोकरांची बदली करणें अपरिहार्य झालें.

तमाम दंतरोगांवर
☆ नागछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ☆

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

हेड ऑफिस : पुणें शहर

शाखा :—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक; खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. | ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. | ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. | १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | ६०,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर्स



## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगासाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | | |
|---|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. | ३५,२३,७०० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. | २६,००,००० |
| | रु. | ६१,२३,७०० |
| गंगाजळी व फंड | रु. | ६१,८३,९०० |
| ठेवी | रु. | १०,७९,८८,००० |
| खेळतें भांडवल | रु. | १३,३५,२४,००० |

### १४ जिल्ह्यांमध्यें ६९ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पुं. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.



टेलिफोन नं. २४८३ "तारेचा पत्ता CENCOBANK"

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि. पुणें शहर

—स्थापना १९१७—

★ लोकशाही राज्ययंत्रणा आणि देशव्यापी नियोजन यांची सांगड घालून समाजवादी अर्थरचना प्रत्यक्षांत आणण्याचा अभिनव प्रयोग आज आपण करीत आहोंत.

★ सहकार हा लोकशाही नियोजनाचा प्राण आहे.

★ लोकशाही नियोजनाचें दुसरें पाऊल—दुसरी पंचवार्षिक योजना यशस्वी होण्यासाठीं आपल्या बचतीची गरज आहे.

★ सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या आमच्या बँकेंत आपली बचत गुंतवा आणि भारताच्या दुरुस्तीचे शिल्पकार व्हा.

खालील बोलके आंकडे बँकेच्या सर्वांगीण प्रगतीची कल्पना देतील.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भागांचें भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भागांचें भांडवल | रु. | ९,२५,९५० |
| गंगाजळी व इतर निधि | रु. | ८,६८,५१८ |
| एकूण ठेवी | रु. | १,७३,७९,३१० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | २,०७,९१,४१० |

वा. ग. अळतेकर
मॅनेजिंग डायरेक्टर.



## दि रत्नाकर बँक, लिमिटेड

स्थापना—१९४३

मुख्य कचेरी :—लक्ष्मी रोड, कोल्हापूर

— शाखा —

सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | रु. १०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | रु. १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | रु. ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. १,४०,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | रु. ५०,००,००० |

*—अद्यावत् बँकिंग-व्यवहार केले जातात—*

श्री. बी. बी. चौधरी, बी. ए., एलएल. बी., वकील. सांगली — चेअरमन

श्री. महादेव बाळाप्पा चौगुले, कोल्हापूर — व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, बी. कॉम, सी. ए. आय. आय. बी.
मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.